आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१६ मे २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- घाटकोपरमध्ये जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १६, बचावकार्य पूर्ण

- रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन हे दोन दिवसांच्या चीन दौऱ्यावर

- सुनील छेत्रीकडून फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर

**आणि**

- मान्सून ३१ मे च्या सुमारास केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त

**<><><><><>**

मुंबईत घाटकोपर परिसरात जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १६ झाली आहे. काल रात्री एका वाहनात आणखी दोन मृतदेह आढळले. याठिकाणचं बचाव कार्य पूर्ण झालं असून आज दिवसभरात राडारोडा हटवला जाईल, अशी माहिती मुंबईचे महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी आज दिली. याठिकाणचे इतर ३ विनापरवाना फलक काढायचं काम सुरू आहे. मुंबई शहरातल्या इतर अशाच फलकांची तपासणी सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भाजपाला संविधान बदलून आरक्षण समाप्त करण्यासाठीच लोकसभेच्या चारशे जागा हव्या आहेत, असं दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी म्हटलं आहे. ते आज लखनौ इथं समाजवादी पार्टीचे प्रमुख अखिलेश यादव यांच्याबरोबर आयोजित केलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत बोलत होते. भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे नेहमीच आरक्षणाच्या

विरोधात राहिले आहेत. त्यांना घटना बदलायची आहे हे आम्ही आधीपासून सांगत असल्याचं अखिलेश यादव यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

देशाच्या प्रमुखाची जबाबदारी सर्व जाती धर्मांना एकत्र ठेवण्याची आहे. पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची विधान ऐक्याला अडचणीत आणणारी असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला. नाशिकमधल्या वणीमध्ये ते काल प्रचारसभेला संबोधित करत होते.

नाशिकमध्ये काल झालेल्या सभेत प्रधानमंत्र्यांनी नाशिकच्या प्रश्नांवर बोलण्याची गरज होती. महाराष्ट्राचे पाणी गुजरातला जात असताना राज्यकर्ते बघ्याची भूमिका घेत असल्याचा दावा त्यांनी केला.

नाशिकच्या कांदा निर्यातीला बंदी आणि गुजरातच्या कांद्याला सूट असे दुहेरी धोरण राबविताना राज्यातले अनेक उद्योग गुजरातला नेल्याची टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. नाशिक शहरात काल आयोजित प्रचारसभेत ते बोलत होते. भ्रष्टाचाराचे आरोप सत्ताधाऱ्यांनी आमच्या सरकारवर केले. मात्र निवडणूक रोखे हा सर्वात मोठा घोटाळा असून यावर खुली चर्चा करण्याचं आव्हान त्यांनी सत्ताधाऱ्यांना दिलं. देश भ्रष्टाचारमुक्त करण्याची घोषणा करणाऱ्या पक्षाने विरोधी पक्षांना भ्रष्टाचारीमुक्त केल्याची उपरोधक टीकाही त्यांनी केली. काश्मीरमधून कलम ३७० हटवून केंद्र सरकारने अदाणी यांना त्याठिकाणी जागा खरेदी करण्याचा मार्ग मोकळा करून दिल्याचा आरोप त्यांनी केला.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण 'दक्षिण मध्य मुंबई' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा

सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

केंद्रीय विद्यापीठातल्या पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठीची CUET UG ही परीक्षा कालपासून सुरू झाली. पहिल्याच दिवशी ७५ टक्क्यांहून अधिक परीक्षार्थींनी हजेरी लावल्याचं राष्ट्रीय चाचणी संस्थेनं कळवलं आहे. देशभरातल्या ३७९ शहरातल्या २ हजार १०० हून अधिक केंद्रांवर ही परीक्षा होत आहे. एकूण सुमारे साडे ११ लाख परीक्षार्थींनी यासाठी अर्ज भरले आहेत.

**<><><><><>**

मध्य प्रदेशात इंदुर अहमदाबाद महामार्गावर काल रात्री झालेल्या अपघातात ८ जण ठार झाले असून १ जण जखमी झाला आहे. मृतांमधील सर्वजण एका जीपने जात असताना एका वाहनाने त्यांच्या जीपला धडक दिली. या वाहनाचा चालक घटनास्थळावरुन फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. जखमी व्यक्तीला जवळच्याच रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्याच्या कोरची तालुक्यातील खसोळा येथील जंगलात तेंदूपाने तोडणाऱ्या हर्षद नरोटे हा १४ वर्षाचा मुलगा अस्वलानं केलेल्या हल्ल्यात जखमी झाला आहे. त्याला  कोरचीच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

**<><><><><>**

जेट एअरवेजचे संस्थापक नरेश गोयल यांच्या पत्नी अनिता गोयल यांचं आज मुंबईत कर्करोगानं निधन झालं. नरेश गोयल हे सध्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी अटकेत असून आपल्या पत्नीच्या शेवटच्या दिवसांमध्ये त्यांच्याबरोबर राहण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयानं त्यांना सशर्त जामीन दिला होता. नरेश गोयल हे देखिल कर्करोगानं पिडीत आहेत.

**<><><><>**

आम आदमी पक्षाच्या खासदार स्वाती मालीवाल यांच्यावर झालेल्या हल्ल्याची दखल राष्ट्रीय महिला आयोगानं घेतली आहे. याप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे स्वीय सहायक विभव कुमार यांना उद्या आयोगासमोर उपस्थित राहण्यासाठी समन्स बजावलं आहे. केजरीवाल यांच्या निवासस्थानी हा हल्ला झाला होता.

**<><><><>**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन हे दोन दिवसांच्या चीन दौऱ्यावर गेले आहेत. बिजींगमध्ये चीनच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी आज त्यांचं स्वागत केलं. पुतीन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात आज द्विपक्षीय चर्चा होईल, अशी माहिती रशियाच्या राष्ट्राध्यक्षाच्या कार्यालयाकडून देण्यात आली. या दौऱ्यात पुतीन यांच्या शिष्टमंडळात रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह, संरक्षण मंत्री आंद्रेई बेलोसोव्ह यांचा समावेश आहे.

**<><><><>**

स्लोवाकियाचे प्रधानमंत्री रॉबर्ट फिको यांची प्रकृती नाजूक आहे. सरकारी बैठक संपवून बाहेर पडत असताना त्यांच्यावर काल गोळीबार झाला. हा आपल्या देशावरचा हल्ला असल्याचं स्लोवाकियाचे गृहमंत्री माटुस सुताज एस्टोक यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या हल्ल्याबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><>**

इस्लामाबाद उच्च न्यायालयानं पाकिस्तानचे माजी प्रधानमंत्री इम्रान खान यांना भ्रष्टाचार प्रकरणी काल जामीन मंजूर केला आहे. पण इतर प्रकरणात त्यांना अजून जामीन मंजूर झालेला नाही.

**<><><><>**

श्रीलंकेत शस्त्र निर्मितीचं युनिट उभारण्यासंदर्भात भारत आणि श्रीलंकेत चर्चा सुरु आहे. श्रीलंकेच्या संरक्षणमंत्री प्रेमिता बंडारा तेन्नकून यांनी प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. श्रीलंका शस्त्रनिर्मिती क्षेत्रात आधीपासून आहे परंतू उत्पादन अपेक्षेहून कमी आहे. गेल्या दहा वर्षात भारतीय संरक्षक क्षेत्रातल्या उत्पादकांची संख्या वाढली आहे. श्रीलंकेला या बाबतीत भारतीय प्रारुपाकडून बरंच काही घेता येण्यासारखं आहे, असं त्यांनी सांगितलं.

<><><><>

गाझा पट्टीतल्या राफामध्ये सुरू असलेलं युद्ध केवळ काही आठवडे सुरू राहील, असा दावा इस्राइलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेत्यानाहू यांनी केला आहे. या भागातल्या हमासच्या ४ तुकड्यांना पराभूत करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. युद्धाच्या मुद्द्यावरुन अमेरिका आणि इस्राइलमध्ये असहमती आहे. पण काही वेळा तुमचं अस्तित्व टिकवून ठेवणं आणि तुमचं भविष्य याचा विचार करावा लागतो, असं एका अमेरिकी वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितलं.

<><><><>

दहशतवादी गटांना सहकार्य करणाऱ्या देशांच्या यादीतून अमेरिकनं क्युबाचं नाव काढून टाकलं आहे. उत्तर कोरिया, सिरीया, इराण आणि व्हेनेझुएला अजूनही या यादीत आहेत.

<><><><>

भारतीय फूटबॉलपटू सुनील छेत्री यानं आपली निवृत्ती आज समाजमाध्यमाद्वारे जाहीर केली. कुवेतशी कोलकत्यात ६ जून रोजी होणारा सामना त्याचा शेवटचा सामना असणार आहे. आपल्याला पदार्पणाच्या पहिल्या दिवसाची आज आठवण येत आहे.  मागच्या १९ वर्षांतली कर्तव्य आणि आनंदाची भावना आपल्या लक्षात आहे, अशी भावना सुनीलनं यावेळी व्यक्त केली. सुनील छेत्रीनं २००५ साली पाकिस्तानविरोधातल्या सामन्यात आंतरराष्ट्रीय फूटबॉलमध्ये

पदार्पण केलं होतं. दीडशे आंतरराराष्ट्रीय सामन्यांत ९४ गोल करण्याची कामगिरी त्याच्या नावावर आहे. सुनील हा क्रिस्तियानो रोनाल्डो आणि लिओनल मेस्सीनंतर जगातला सर्वाधिक गोल करणारा फूटबॉलपटू म्हणून ओळखला जातो.

**<><><><><>**

भारताचा भालाफेकपटू नीरज चोपडा यानं भुवनेश्वर इथं सुरू असलेल्या फेडरेशन कपमध्ये सुवर्ण पदक जिंकलं आहे. पहिल्या दोन फेऱ्यात नीरज दुसऱ्या स्थानावर होता. पण, चौथ्या फेरीत त्याने ८२ पूर्णांक २७ मीटर भाला फेकत आघाडी घेतली. नीरजने २०२१ मध्ये याच स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावलं होतं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायजर्स हैदराबादचा सामना गुजरात टायटन्स बरोबर होणार आहे. हैदराबादच्या राजीव गांधी स्टेडिअमवर संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. गुणतालिकेत हैदराबाद १४ गुणांसह चौथ्या आणि गुजरात टायटन्स ११ गुणांसह आठव्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

टी २० जागतिक क्रिकेट विश्व कप स्पर्धा २०२४ दरम्यान काही खाजगी वाहिनींनी भारतीय भाषांमधील फलकांसाठी आणि समालोचनासाठी खाजगी संस्थांबरोबर केलेल्या कराराची माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर यांनी प्रशंसा केली आहे. सरकारच्या सर्वसमावेशक धोरणांच्या दिशेनं उचललेल हे आशादायक पाऊल असल्याचही ते म्हणाले.

**<><><><><>**

नैऋत्य मौसमी पाऊस ३१ मे च्या सुमारास केरळात दाखल होईल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. गेल्यावर्षी ८ जून रोजी मान्सून केरळात आणि ११ जून रोजी महाराष्ट्रात आला होता. हवामान विभागाच्या यंत्रणेनुसार

यंदा २८ मे ते ४ जून दरम्यान हा पाऊस दाखल होईल. दक्षिण अंदमानमध्ये येत्या रविवारपर्यंत मान्सून येण्याची शक्यता हवामान खात्यानं यापूर्वीच वर्तवली आहे.

//<><><><><>//